लोकमत

# मुंदडे विद्यालयात सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणक शास्त्र प्रशाळा व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पी. एम. मुंदडे माध्यमिक विद्यालय, जळगाव येथील ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेसंदर्भात माहिती देण्यात आली.

संगणक प्रशाळेतील विद्यार्थी सचिन पाटील व मयूर बंडे यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. यावेळी जळगाव येथील सायबर क्राईम विभागातील पोलिस कर्मचारी अरविंद वानखेडे यांनीही मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमावेळी शाळेचे मुख्याध्यापक कुमावत, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.